सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३११ **अत्यंत महत्वाचे** दिनांक : २९/११/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसरातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : National Book Trust, India यांचेमार्फत आयोजित उपक्रमाच्या सभेस उपस्थित राहणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया (शिक्षण मंत्रालय, भारत सरकार) ६७ वर्षाहून अधिक काळापासून देशात पुस्तकांच्या प्रचारासाठी आणि वाचनाची सवय वाढविण्यासाठी काम करत आहे. सदर संस्थेद्वारे देशभरात विविध पुस्तकांशी संबंधित पुस्तक मेळावे आणि प्रदर्शने, साहित्यिक कार्यक्रम, परिसंवाद आणि परिषद, मुलांसाठी उपक्रम, अनुवाद कार्यशाळा, प्रकाशकांचे संमेलन, प्रदर्शन व्हॅनद्वारे पुस्तक परिक्रमा अशा प्रकारचे उपक्रम राबविते.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत विशेषत: विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात 'पुणे बुक फेस्टीवल' दि. १६ ते २४ डिसेंबर, २०२३ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. सदर फेस्टीवल मध्ये २०० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल्स, मुलांसाठी व तरूणांसाठी पॅवेलियन, विविध लेखकांची साहित्यिकांची पुस्तके, सांस्कृतिक कार्यक्रम विविध प्रदर्शनाचा समावेश आहे.

तरी सदर National Book Trust, India यांचेमार्फत आयोजित उपक्रमाच्या सभेस राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, ग्रंथपाल, सर्व भाषा विषयांचे शिक्षक यांनी **दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्पीथिएटर सभागृहात** उपस्थित रहावे.

कळावे ही विनंती.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ